## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ :-९१८७+९१८८/२०२४/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| दीपक पुरुषोत्तम कोतकुंडे | मुख्य लिपीक, उपनिबंधक, सहकारी संस्था शहर(४), पुणे | उपनिबंधक, सहकारी संस्था,पुणे शहर(४), पुणे |

**( सुनावणी दिनांक - ०९/०२/२०२६ )**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि.१६.१२.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपीलार्थी यांनी खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| द्वितीय अपील क्र . | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|---|
| ९१८७ | १९.१२.२०२२ | अरविंद सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, हिंगणे खुर्द, पुणे-४११ ०५२ या संस्थेचे अधिनियमाच्या कलम ८२ नुसार सन २०१२-२०१३ ते २०२१-२०२२ या कालावधीत झालेल्या लेखापरिक्षणातील दोष संबंधात तत्कालीन पदाधिकाऱ्यांनी उपनिबंधकांकडे दाखल स्पष्टीकरणाच्या प्रती, त्यावर सदर दोष दुरुस्ती संदर्भात उपनिबंधकांनी दिलेल्या आदेशाच्या प्रती. |

| | | |
|---|---|---|
| ९१८८ | १९.१२.२०२२ | अरविंद सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, हिंगणे खुर्द, पुणे-४११ ०५२ या संस्थेचे कलम ७५(२) आणि ७५(४) नुसार सन २०१२-२०१३ ते २०२१-२०२२ या कालावधीत झालेल्या लेखापरीक्षण अहवाल, दोष दुरुस्ती अहवाल, समितीचा अहवाल ठेवण्यात आल्याची संस्थेच्या इतिवृत्तातील नोंदीच्या प्रती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, "संस्थेने काहीही माहिती दिली नाही. माहिती देणेचा आदेश करणेत यावा."

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, "संस्थेला दि.२५.०१.२०२३ च्या पत्राने माहिती अर्ज वर्ग करणेत आला आहे, परंतु संस्थेने माहिती दिली नाही."

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी दि.२५.०१.२०२३ च्या पत्राने चेअरमन/सेक्रेटरी, अरविंद सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, हिंगणे खुर्द यांना माहिती अर्ज वर्ग करुन माहिती अपिलार्थीला देणेबाबत कळविले होते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१९.०४.२०२३ रोजी संस्थेने अपिलार्थीस विनामुल्य माहिती देणेबाबत आदेश पारित केला आहे. परंतु अपिलार्थी यांच्या म्हणण्याप्रमाणे संस्थेने त्यांना आजअखेर माहिती दिली नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८)(क)(२) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,पुणे शहर (४), पुणे यांना याप्रकरणी जनमाहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थींने दोन्ही जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने चेअरमन/सेक्रेटरी, अरविंद सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, हिंगणे खुर्द यांचेकडून दि.०१.०३.२०२६ अखेर पर्यंत माहिती प्राप्त करून घेऊन अपिलार्थीस व्यक्तीशः विनामुल्य पुरवावी.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत दोन द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ९१८७+९१८८/२०२४/ पुणे 582/2026 दिनांक - 10/2/2026